**ठळक बातम्या**

- भारत विस्तारवाद नव्हे, तर विकासवादाच्या दिशेने काम करत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन / नौदलाच्या २ नौका आणि एका पाणबुडीचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते राष्ट्रार्पण

- ७७व्या लष्कर दिनानिमित्त देशाचं सेनादलाला अभिवादन

- मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी न्यायमूर्ती आलोक आराधे

**आणि**

- दक्षिण कोरियाचे राष्ट्रपती यून सुक येओल यांना अटक

**<><><><><><>**

भारत विस्तारवाद नाही, तर विकासवादाच्या दिशेने काम करतो आहे. भारताने खुल्या, सुरक्षित, समावेशक आणि समृद्ध हिंद प्रशांत क्षेत्राचं नेहमीच समर्थन केलं आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मुंबईत नौदलाच्या गोदीत आयएनएस सूरत, आयएनएस नीलगिरी या युद्धनौका आणि आयएनएस वाघशीर ही पाणबुडी नौदलाच्या ताफ्यात समाविष्ट केल्यानंतर ते बोलत होते. नौदलाच्या ताफ्यात एकाच वेळी एकापेक्षा अधिक युद्धनौका आणि पाणबुडी समाविष्ट होण्याची ही पहिलीच वेळ आहे. यामुळं भारताची सुरक्षा आणि प्रगतीला नवीन सामर्थ्य मिळेल असं ते म्हणाले.

**होल्ड... बाइटः प्रधानमंत्री**

छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतात नौदलाची स्थापना केली, त्याच पवित्र धरतीवर २१व्या शकताच्या नौदलाला बळकटी देण्याच्या दिशेनं हे खूप मोठं पाऊल असल्याचं प्रतिपादन त्यांनी केलं. आज भारत संपूर्ण जगात, विशेषतः ग्लोबल साऊथ क्षेत्रात एक विश्वासार्ह आणि जबाबदार मित्र देश म्हणून ओळखला जातो. आर्थिक प्रगती, ऊर्जा सुरक्षा यासाठी जलसुरक्षा आवश्यक असल्याचं प्रतिपादन त्यांनी केलं. गेल्या १० वर्षांत भारताच्या तिन्ही सशस्त्र दलांनी आत्मनिर्भरतेचा मंत्र अवलंबला आहे, त्याचं त्यांनी कौतुक केलं. सर्वांच्या सहकार्यानं लवकरच संरक्षण क्षेत्राचा कायापालट होईल, असं त्यांनी सांगितलं. संकटकाळात इतर देशांवरचं भारताचं अवलंबित्व कमी करणं, रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करणं यामुळे शक्य होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गेल्या १० वर्षात नौदलाच्या ताफ्यात ३३ युद्धनौका आणि ७ पाणबुड्या सहभागी झाल्या आहे. यातल्या ३९ देशात बनवल्या होत्या याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

वाढवण बंदराला मंजुरी, सीमावर्ती भागांमध्ये वाढती जोडणी, भारतमाला योजना, व्हायब्रंट व्हिलेज कार्यक्रम, इत्यादी कार्यक्रमांचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. भविष्यात अवकाश आणि खोल समुद्र या दोन क्षेत्रांचं महत्त्व खूप वाढणार असून त्या क्षेत्रात भारताची ताकद वाढवण्याचं काम सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं.

हिंद प्रशांत क्षेत्र भारतासाठी ऐतिहासिक काळापासून महत्त्वाचं आहे, त्यामुळे या क्षेत्रात सशक्त नौदल असणं हे देशासाठी मोठं प्राधान्य आहे. ते साध्य करण्याच्या दृष्टीने या तीन नौकांचं नौदलात सहभागी होणं हा मोठा मैलाचा दगड असल्याचं प्रतिपादन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केलं.

भारतीय नौदलाच्या वेगवान कामामुळेच हिंद प्रशांत क्षेत्रातली समुद्री सुरक्षा कायम ठेवण्यात नौदलाला यश आलं आहे, असं मत नौसेना प्रमुख ॲडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी यांनी मांडलं.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><><>**

सशस्त्र दलाच्या अतुलनीय बलिदानाचा सन्मान करण्यासाठी आज लष्कर दिन साजरा केला जात आहे. भारतीय लष्कराचं सैनिकांचं शौर्य, बांधिलकी आणि मातृभूमीची सेवा यांचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे. याच दिवशी १९४९मध्ये तत्कालीन जनरल के. एम. करिअप्पा यांनी शेवटच्या ब्रिटीश कमांडर इन चीफकडून भारतीय सैन्याची सूत्रं हातात घेतली होती. या घटनेच्या स्मरणार्थ लष्कर दिन साजरा केला जातो.

लष्कर दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी लष्करातले जवान आणि ज्येष्ठ तसंच निवृत्त सैन्य अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. सैनिक देशाच्या प्रगतीसाठी आणि समृद्धीसाठी शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी

योगदान देतात. आपल्या सीमेचं रक्षण करण्यासाठी ते सदैव सज्ज असतात, असं मुर्मू यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लष्कर दिनानिमित्त सैन्यातल्या जवानांना शुभेच्छा दिल्या आहेत. आपल्या दृढनिश्चयाच्या बळावर भारतीय लष्कराने सदैव देशाचं संरक्षण केलं आहे. देशावर येणाऱ्या नैसर्गिक संकटांच्या काळातही मदत करण्यासाठी ते तत्पर असतात. भारताच्या सीमांचं रक्षण करून कोट्यवधी भारतीयांना सुरक्षित ठेवणाऱ्या लष्कराप्रति देश सदैव कृतज्ञ आहे, असं मोदी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हणाले आहेत. सरकार सैन्य दलांमध्ये विविध सुधारणा तसंच आधुनिकीकरणाला प्राधान्य देत असल्याचंही मोदी म्हणाले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही समाज माध्यमावरच्या संदेशातून सैन्यातल्या जवानांना शुभेच्छा दिल्या आहेत. सैनिकांना दाखवलेल्या शौर्याच्या बळावरच भारतीय लष्कर हे जगातल्या सर्वोत्तम लष्करांपैकी एक ठरलं आहे. प्रतिकूल परिस्थितीतही ते देशाचं रक्षण करण्यासाठी सज्ज असतात आणि प्रसंगी सर्वोच्च बलिदान देतात, असं म्हणत शहा यांनी देशासाठी शहीद झालेल्या सैनिकांना अभिवादन केलं आहे.

**<><><><><><>**

७७ व्या लष्कर दिनाचं मुख्य संचलन आज पुण्यात बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपच्या मैदानावर होत आहे. या संचलन सोहळ्याला लष्कर प्रमुख जनरल

उपेंद्र द्विवेदी उपस्थित राहणार आहेत. लष्कर दिनानिमित्त संध्याकाळी होणाऱ्या गौरव गाथा या कार्यक्रमाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उपस्थित राहणार आहेत. लष्कर दिनानिमित्त होणारं संचलन पहिल्यांदाच पुण्यात होत असून यामध्ये लष्कर, पोलीस दल आणि महाराष्ट्र एनसीसीचं महिला पथक सहभागी होणार आहे.

**<><><><><>**

सीआयएसएफ अर्थात केंद्रीय औद्योगिक संरक्षण दलाच्या दोन राखीव बटालियनच्या निर्मितीला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. त्यामुळे सीआयएसएफच्या बटालियनची संख्या १५ होणार आहे. या बटालियनमध्ये एक हजार २५ सैनिक असतील तसंच याचं नेतृत्व वरिष्ठ कमांडंट स्तराचा अधिकारी करेल.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी दोन दिवसांच्या स्पेन दौऱ्यात स्पेनचे राष्ट्राध्यक्ष पेद्रो सँचेज यांची भेट घेतली. दोन्ही देशातले संबंध अधिक दृढ करण्याबाबत उभय नेत्यांनी सहमती दर्शवली.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दोन उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायमूर्तींच्या बदल्या केल्या आहेत. तेलंगण उच्चन्यायालयाचे मुख्य

न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आता मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असतील. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांना दिल्ली उच्च न्यायालयात मुख्य न्यायाधीश पद मिळालं आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने गेल्या ७ जानेवारीला त्यांच्या बदलीची शिफारस केली होती.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असतानाच सर्व पक्षांचे नेते मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. भाजपाचे परवेश वर्मा आणि रोहिणी गुप्ता हे आज नामांकन अर्ज दाखल करणार आहेत. आपचे नेते मनिश सिसोदिया हे जंगपुरा मतदारसंघातून अर्ज दाखल करणार आहेत.

**<><><><><>**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नवीन मुख्यालयाचं उद्घाटन आज नवी दिल्लीत झालं. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, आणि काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी यांनी या इंदिरा भवनचं उद्घाटन केलं. लोकसभेतले विरोधी पक्ष नेता राहुल गांधी आणि इतर ज्येष्ठ नेते यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

मकर संक्रांतीच्या पुण्य पर्व काळात प्रयागराज इथं आयोजित महाकुंभमेळ्यात आतापर्यंत सुमारे साडेतीन कोटी लोकांनी अमृत स्नान केलं आहे. दरम्यान, जगातल्या सर्वात भव्य अशा या आध्यात्मिक सोहळ्यात सहभागी होणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस अत्याधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेत असून, प्रतिबंधित क्षेत्रात बळजबरीनं प्रवेश करु पाहणारे नऊ ड्रोन्स निकामी करण्यात आल्याचं वृत्त आहे.

**<><><><><><>**

दक्षिण कोरियाचे राष्ट्रपती यून सुक येओल यांना पोलिसांनी आज ताब्यात घेतलं. राष्ट्रपतींना ताब्यात घेण्याची ही दक्षिण कोरियाच्या इतिहासातली पहिलीच वेळ आहे. गेल्या महिन्यात देशात मार्शल लॉ लादल्यानंतर योओल यांच्याभोवती वादाचं वादळ उठलं होतं. येओल यांना ग्योंगगी प्रांतातल्य ग्वानचेओन इथल्या भ्रष्टाचार तपास कार्यालयात नेण्यात येईल. दरम्यान, संघर्ष टाळण्यासाठी आपण भ्रष्टाचार तपास कार्यालयात उपस्थित राहायचं ठरवल्याचं येओल म्हणाले. येओल यांच्यावर नॅशनल ऍसेम्बीलमध्ये महाभियोग प्रस्ताव मंजूर झाला आहे.

**<><><><><><>**

दक्षिण आफ्रिकेतल्या नॉर्थ-वेस्ट परगण्यात एका सोन्याच्या खाणीत अडकलेल्या ८२ कामगारांना सुखरुप बाहेर काढण्यात आलं असून ३६ मृतदेह हाती लागले आहेत.

**<><><><><>**

दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन आज छत्रपती संभाजीनगर इथं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्या उपस्थितीत होत आहे. यंदाचा पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ लेखिका, नाटककार, निर्मात्या सई परांजपे यांना प्रदान करण्यात येत आहे. या उद्घाटन सोहळ्याआधी भारतीय सिनेसृष्टीचे संस्थापक दादासाहेब फाळके यांनी १०५ वर्षांपूर्वी दिग्दर्शित केलेला प्रसिद्ध मूकपट कालियामर्दन चं विशेष प्रदर्शन होणार आहे, तर रात्री नऊ वाजता आयनॉक्स, प्रोझोन मॉल इथं लिटील जाफना या चित्रपटानं या महोत्सवाचा प्रारंभ होणार आहे.

**<><><><><>**

केरळचे उद्योग मंत्री पी. राजीव यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ संयुक्त अरब अमिराती दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात राजीव यांनी यूएईचे गुंतवणूक मंत्री मोहम्मद हसन अल सुवैदी आणि चेंबर ऑफ कॉमर्सचे चेअरमन अहमद जसीम अल जाबी यांची भेट घेतली.

**<><><><><>**

खो-खो विश्वचषक स्पर्धेत काल भारतीय महिला संघाने दक्षिण कोरियाच्या संघावर १७५-१८ अशा मोठ्या गुणफरकाने विजय मिळवला. आज भारताच्या महिला संघाचा सामना इराणशी होणार आहे.

**//<><><><><><>//**